माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : २०३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. मदन परशरामजी शेळके**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
हनुमान नगर झोन क्र.३, महानगरपालिका, तुकडोजी चौक जवळ, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
हनुमान नगर झोन क्र.३, महानगरपालिका, तुकडोजी चौक जवळ, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०९.२०२१ | २९.०९.२०२१ | ०५.१०.२०२१ | १४.०६.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २१.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " शासकीय मेडीकल हॉस्पीटल व खाजगी हॉस्पीटल येथे मृत पावलेल्या व शासकीय मेडीकल हॉस्पीटल येथे पोस्टमार्टम झालेल्या व्यक्तींच्या नोंदी मनपा नागपूर झोन क्र.३, हनुमान नगर येथे घेतल्या जातात. दि. ०२.१२.२०१९ ते दि. १५.१२.२०१९ या कालावधीत मृत्यु पावलेल्या व्यक्तींच्या नोंदी असलेल्या रजिस्टरच्या पानाच्या सत्यप्रती प्रमाणित करुन पुरविण्यात याव्या" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी,आरोग्य विभाग, झोन क्र.३, मनपा नागपूर यांनी दिनांक २९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, हनुमान नगर झोन अंतर्गत येत असलेल्या शासकीय व खाजगी दवाखान्यांमधील नोंदी झालेल्या संपुर्ण मृत्यु घटनांच्या नोंदी हया त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. आपण आपल्याशी संबंधित माहिती नमुद करुन दिल्यास त्यानुसार माहितीचा शोध घेवून आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०५.१०.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "आवश्यक असलेली माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक १४.०६.२०२२ अन्वये,अर्जदाराने मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. तरी नेमकी नावानिशी माहिती मागितल्यास ती त्यांना देण्यात यावी, असे आदेशित केले.

तत्पूर्वीच अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २०.०१.२०२२ रोजी** " सुनावणी घेतली नाही व माहिती पुरविली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २१.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक २६.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती परंतु काही कारणास्तव सदर सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ शकलेली नाही. त्यानंतर सदर प्रकरणात आज दिनांक २८.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य स्वच्छता अधिकारी, श्री. दिनेश माणिकराव कलोडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७.०८.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, हनुमान नगर झोन अंतर्गत येत असलेल्या शासकीय व खाजगी दवाखान्यांमधील नोंदी झालेल्या संपुर्ण मृत्यु घटनांच्या नोंदी हया त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. आपण आपल्याशी संबंधित माहिती नमुद करुन दिल्यास त्यानुसार माहितीचा शोध घेवून आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक १४.०६.२०२२ अन्वये,अर्जदाराने मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. तरी नेमकी नावानिशी माहिती मागितल्यास ती त्यांना देण्यात यावी, असे आदेशित केले.

प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी श्री. शेळके यांना त्यांच्या यापूर्वीच्या अपील क्र. १९७/२०२२ ते २०१/२०२२ यात वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका नागपूर यांच्या वतीने उपलब्ध असलेली माहिती व अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधित खाजगी हॉस्पीटल यांच्याकडून मागवून

अपिलार्थीस प्रदान केलेली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रतिसादात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांचेशी संबंधित माहितीबाबत स्पष्ट असा अर्ज केल्यास महानगरपालिकेच्या जन्म मृत्यु विभाग यांच्या कार्यालयीन अभिलेखावर कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०२.२०२४**

जावक क्रमांक EC099 दिनांक 10 SEP 2024